# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-४८** **दिनांक - १५/०२/२०२४**

## रिक्षा चोरी करुन त्या रिक्षांचा नंबर बदलुन त्या शिफ्ट वरती दुस-याला चालवायला देवुन त्यांचेकडुन शिफ्टचे पैसे घेणा-या टोळीच्या म्होरक्यास शिताफिने अटक करुन ११ गुन्हयांची उकल करण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दिनांक ०३/०२/२०२४ रोजी रात्री २१.३० वा ते दिनांक ०४/०२/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा चे दरम्यान फिर्यादी यांनी त्याचे ताब्यातील ॲटो रिक्षा हि भाईंदर पश्चिम येथील राई पुला जवळ सार्वजनिक रस्त्यावर पार्क करुन घरी गेले असता अज्ञात इसमाने स्वताच्या फायदयाकरीता लबाडीच्या ईरादयाने चोरी केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०६/०२/२०२४ रोजी भाईंदर पोलीस ठाणेत अज्ञात इसमा विरुध्द गुरक्र. ६०/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करत होती.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात दिवसेनदिवस वाहन चोरीचे प्रमाणात वाढ होत असल्याने अशा गुन्हयांना आळा घालणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सुचना देण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने वपोनिरी.संदिप कदम यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यानी घडणाऱ्या प्रत्येक वाहन चोरीच्या गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवुन आरोपीचा शोध घेत असताना पोहवा/शिवाजी पाटील यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम विरार पुर्व येथील रामु कम्पाऊन्ड, अंबा मदीराचे पाठीमागील बाजुच्या एका कोप-यात चोरीच्या रिक्षा व मोटार सायकल डम करुन त्याचे पार्ट वेगवेगळे करुन विक्री करत आहे. त्यानुसार सपोनि/दत्तात्रय सरक व पथक यांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन सापळा रचला असता एक इसम रिक्षाची छेड छाड करीत असल्याचे दिसल्याने आश्रफ ऊर्फ सलमान मंहमद परवेज शेख, वय-३२ वर्षे, रा. रुम क्र.०६, गगनगिरी अपार्टमेन्ट, मकवाना कॉम्पेक्स, गोपचरपाडा, विरार पुर्व ता.वसई जि.पालघर यास शिफातीने ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याचे बाजुस उभ्या असलेल्या ९ रिक्षा व २ मोटर सायकल त्याने त्याचे साथीदार याचे सोबत चोरल्या असल्याचे सांगितल्याने त्याने चोरी केलेल्या ९ रिक्षा, २ मोटर सायकल व मोबाईल फोन असा एकुण ६,८८,५००/- रुपये किंमतीचा मुददेमाल त्याचेकडुन जप्त करण्यात आला असुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, मुंबई शहर आयुक्तालय, ठाणे शहर आयुक्तालय येथील खालीलप्रमाणे एकुण ११ चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

:- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | भाईंदर पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ६०/२०२४ भा.द.वि कलम ३७९ |
| ०२ | दिंडोशी पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं ८३५/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०३ | एमएचबी कॉलनी पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं ४२२/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०४ | चारकोप पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं २८०/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०५ | चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ०७/२०२४ भा.द.वि कलम ३७९ |
| ०६ | चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं २९४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०७ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ४१४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०८ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ३३३/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०९ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ७४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| १० | कापुरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ३३९/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ११ | विरार पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं १२०१/२०२२ भा.द.वि कलम ३८० |

नमुद अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन तो खालील नमुद गुन्हयात तो पाहिजे आरोपी आहे.

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ८५/२०२४ भा.द.वि कलम ३७९, ३४ |

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे व.पो.नि. संदिप कदम, पो.नि. राहुल राख, सपोनि. दत्तात्रय सरक, सपोनि. नितीन बेंद्रे, पोउपनि. हितेंद्र विचारे, सपोउनि. श्रीमंत जेधे, पोहवा/०६०५६ शिवाजी पाटील, पोहवा/०७०३३ गोविंद केंद्रे, पोहवा/०७०६२ राजाराम काळे, पोहवा/०७१११ सतिश जगताप, पोहवा/९६०२६ आसिम मुल्ला, पोहवा/०८०२० महेश वेल्हे, पोहवा/०४००९ संग्राम गायकवाड, पोहवा/१२०१० अनिल नागरे, पोहवा/०७१६३ हनुमंत सुर्यवंशी, पोहवा/९६०५० मनोहर तावरे, पोहवा/०६०३० राजविर संधु तसेच स.फौ.संतोष चव्हाण नेम- सायबर सेल, मसुब जवान सचिन चौधरी यांनी केलेली आहे.